# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 25 June 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २५ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामांना केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी
- संविधान हत्या दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम, आणीबाणी देशासाठी काळा अध्याय, पंतप्रधान नरेंद्र मोदी

आणि

- भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्लांची ऐतिहासिक अंतराळ भरारी, चार अंतराळवीर १४ दिवसांसाठी अवकाशात झेपावले

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील विकास कामांना मंजुरी देण्यात आली. वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मार्गाच्या मेट्रो प्रकल्पास या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यासाठी तीन हजार ६२६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीतील निर्णयांची पत्रकार परिषदेत माहिती दिली. सरकारने आतापर्यंत देशभरातील २४ शहरांमध्ये मेट्रो रेल्वे सेवेचा विस्तार केला असल्याचं ते म्हणाले.

****

देशात आणीबाणीची घोषणा होण्याला आज पन्नास वर्ष पूर्ण झाली. देशभरात त्या निमित्ताने संविधान हत्या दिवस आज पाळण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणीबाणी हा देशासाठी काळा अध्याय असल्याचं म्हटलं आहे. आणीबाणीविरुद्धच्या लढाईत ठामपणे उभे राहिलेल्यांना पंतप्रधानांनी अभिवादन केलं. पन्नास वर्षांपूर्वी आजच्या दिवशी भारतीय संविधानातील मूल्यांना बाजूला

करण्यात आले होते. मूलभूत अधिकार निलंबित करण्यात आले. माध्यमांचे स्वातंत्र्य संपुष्टात आणले. आणि अनेक राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिकांना तुरुंगात टाकण्यात आले होते. देशातील नागरिकांच्या सामूहिक संघर्षामुळेच तत्कालीन काँग्रेस सरकारला आणीबाणीचा निर्णय मागे घ्यावा लागला आणि निवडणुका घ्याव्या लागल्या. त्यावेळी जनतेने लोकशाहीविरोधी काँग्रेसचा मोठा पराभव केला, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

****

२५ जून १९७५ हा दिवस भारतीय लोकशाहीसाठी सगळ्यात काळा दिवस असून त्याची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणूनच तो दिवस कायम लक्षात राहण्याची गरज आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. संविधान हत्यादिवसानिमित्त मुंबईत राजभवन इथं आणीबाणीत संघर्ष करणाऱ्यांच्या स्मरणार्थ आणि सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आणीबाणी जाहीर झाली त्या दिवसाचं आणि आणीबाणीच्या कालखंडाचं स्मरण त्यांनी केलं.

आणीबाणी लागू करणं ही लोकशाहीची हत्या होती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना संपवणारा तो काळा दिवस होता, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितलं. या काळात लोकशाहीच्या सेनानींच्या लढ्यामुळे भारताची राज्यघटना आणि लोकशाही वाचली. आता भारताची लोकशाही इतकी प्रगल्भ आहे, की कुणीही कितीही प्रयत्न केला, तरी ती संपवू शकणार नाही, असंही फडणवीस यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

आणीबाणीच्या काळात देशाच्या लोकशाहीसाठी लढा देणाऱ्या सर्व ज्ञात–अज्ञात भारतीयांचा संघर्ष कायमच आपल्यासाठी प्रेरणादायी, ऊर्जादायी ठरेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली.

****

जिल्हाधिकारी कार्यालयात आणीबाणीच्या काळात लोकशाहीकरिता लढा देताना सामाजिक आणि राजनैतिक कारणासाठी कारावास भोगलेल्या बीड जिल्ह्यातील ५७ जणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्वाक्षरी असलेले सन्मान पत्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते आज सन्मानपूर्वक देण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर

स्वामी, कारावास भोगलेले विजयकुमार पालसिंगलकर आदींची मंचावर उपस्थिती होती. आणीबाणीचा काळ हा भारतीय लोकशाहीसाठी काळा अध्याय होता, अशा प्रतिक्रिया यावेळी आणीबाणीत कारावास भोगलेल्या नागरिकांनी दिल्या.

**बाईट – पंजाब म्हस्के आणि सत्यनारायण लोहिया**

****

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी आज अंतराळात भरारी घेतली. नासाच्या एक्सिओम चार या अवकाश मोहिमेला आज फ्लोरिडा इथल्या केनेडी स्पेस सेंटरवरून आज दुपारी बारा वाजून एक मिनिटांनी प्रारंभ झाला. चार अंतराळवीरांना घेऊन अंतराळात हे यान झेपावलं.

अंतराळात शुभांशू शुक्ला यांनी आपलं यान अवकाशात झेपावताच जय हिंद, जय भारत असा संदेश भारतीयांना पाठविला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभांशू शुक्ला यांच्यासह सर्व अंतराळवीरांना शुभेच्छा दिल्या आहेत. ४१ वर्षांपूर्वी भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा हे यशस्वी अंतराळ मोहीम करून आले होते. आपल्या संदेशात ते म्हणाले –

**बाईट – शुभांशु शुक्ला, अंतराळवीर**

****

सरन्यायाधीश भूषण गवई यांची बावन्नावे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ वकील संघातर्फे उद्या छत्रपती संभाजीनगर इथं सत्कार करण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत हे अध्यक्षस्थानी असतील तर सर्वोच्च न्यायालयचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता न्यायमूर्ती ए. एस.चांदूरकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील अशी माहिती, संघाचे अध्यक्ष विधीज्ञ अविनाश बोरुलकर यांनी दिली. शहरातील रुक्मिणी हॉलमध्ये सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होईल.

****

आषाढी वारीत वारकऱ्यांना आवश्यक सुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडून १५ कोटी रुपये तर जिल्हा नियोजन समितीतून ८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली. या निधीतून गरज असेल त्या ठिकाणी रस्ता दुरुस्ती, मुरुमीकरण, शौचालये वारकऱ्यांना आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुबन देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. मानाच्या पालख्यासमवेत ६ हजार २५० फिरते शौचालयं, याशिवाय

आषाढी एकादशीला पंढरपूरात होणारी गर्दी लक्षात घेऊन कायमस्वरुपी साडे चार हजार मोबाईल टायलेटची सुविधा यंदा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

****

पंढरपूर इथल्या श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात हिंगोली जिल्ह्यातील ६ भाविकांनी बनावट पासद्वारे दर्शन घेण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हे भाविक विठ्ठल मंदिरात प्रवेशासाठी दाखल झाल्यानंतर स्कॅनिंग दरम्यान त्यांचे टोकन पास बनावट असल्याचे स्पष्ट झालं. मंदिर प्रशासनाने तातडीने कारवाई करत या भाविकांची चौकशी करून त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिलं.

****

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा उद्या दुपारी नीरानदी स्नानानंतर सातारा जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. या सोहळ्याच्या लोणंद येथील स्वागतासाठीची जय्यत तयारी जिल्हा प्रशासनानं केली आहे. यंदा पालखीचा लोणंद येथे एकच मुक्काम असल्याने याठिकाणी जास्तीची गर्दी होण्याच्या शक्यतेने आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. एक दिवसाचा मुक्काम आटोपून पालखी सोहळा शुक्रवारी तरडगावकडे मार्गस्थ होणार आहे. याठिकाणी पालखीचा दुसरा मुक्काम असून वाटेत चांदोबांचा लिंब येथे सोहळ्यातील पहिले उभे रिंगण दुपारी पार पडणार आहे. पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर या परिसरातील संपूर्ण वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात भिंगारमध्ये संत जनार्दन स्वामी महाराज दिंडीचं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने भक्तीभावाने स्वागत करण्यात आलं. यावेळी पालखीतील पादुकांचं पूजन करण्यात आलं. नगर–करमाळा मार्गे ही दिंडी पंढरपूरला प्रस्थान करणार आहे.

****

मराठवाड्याच्या विकासासाठी महत्वपूर्ण असणाऱ्या ‘अहिल्यानगर–बीड–परळी’ रेल्वेच्या कामाला गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. आज मंत्रालयात ‘उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षा’ची बैठक पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली त्यावेळी ते बोलत होते. राज्यातील पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती देताना नागरिकांना त्रास होऊ नये याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

****

हॉकी इंडिया मास्टर्स चषक स्पर्धेचा पहिला आणि दुसरा उपांत्य फेरीचा सामना आज चेन्नाईत होत आहे. पहिल्या सामन्यात तामिळनाडूचा सामना चंदिगडशी होईल तर दुसरा सामना महाराष्ट्र आणि ओडिशा यांच्यात होईल.

****

परवा शुक्रवारी ओडिशामध्ये होणाऱ्या रथयात्रेसाठी चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. पहिल्यांदाच, पुरी आणि आसपास एकात्मिक कमांड-अँड-कंट्रोल सिस्टम स्थापित करण्यात आली आहे. रथयात्रेसाठी जगन्नाथ पुरी शहरात पोलिस दलाच्या दोनशे कंपन्या तर सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या आठ कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत.

****